दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करणे व एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३- २८ च्या प्रचार व प्रसिध्दीकरिता नियोजित कार्यक्रम राबविण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.हातमाग-२०२५/प्र.क्र.६२/टेक्स-३**
नवीन प्रशासन भवन,१४ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : १६ मार्च, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०१५/प्र.क्र.१४७/टेक्स-३ दि.१७.१०.२०१६.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६. २०२३
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०२३/प्र.क्र.९३/टेक्स-३, दि.१०.११.२०२३
४) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र क्र.कार्या-२/राष्ट्रीय हातमाग दिवस/३४३९/२०२५, दि.०७.०७.२०२५
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०२५/प्र.क्र.६२/टेक्स-३, दि.१२.०९.२०२५
६) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र क्र.कार्या २/राष्ट्रीय हातमाग दिवस/२१८/२०२६, दि.०९.०१.२०२६
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.२९.०१.२०२६

**प्रस्तावना-**

राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी व वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांना हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२३ मध्ये पुढील ५ वर्षांच्या कालावधीसाठी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर केले आहे. सदर धोरणातील मुद्दा क्र.७.८ मधील पारंपारिक वस्त्रोद्योग, अतिरीक्त प्रोत्साहने अंतर्गत हातमाग विणकर समुदायांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि सामाजिक व आर्थिक विकासात या क्षेत्राच्या योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी महाराष्ट्रातील ५ पारंपारिक क्षेत्रामधील सर्वोकृष्ट डिझाईनचा राष्ट्रीय हातमाग

दिनानिमित्त सत्कार केला जाईल असे नमूद आहे. आयुक्त (वस्त्रोद्योग) यांच्या संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये दिनांक ७ ऑगष्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करण्यासाठी रूपये २५.०० लाखाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यास अनुसरून चालू आर्थिक वर्षात रुपये १०.०० लाख इतका निधी आयुक्त (वस्त्रोद्योग) यांना संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधी महाराष्ट्र राज्य सहकारी हातमाग महासंघ मर्यादित (महाटेक्स), मुंबई यांना राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त मंत्रालय, मुंबई परीसरात आयोजित केलेल्या प्रदर्शनीकरीता खर्च करण्यात आला असून एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत हातमाग कापड प्रचार प्रसिध्दी व वस्त्रोद्योग क्षेत्रातील कापड स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट डिझाइन करीता विणकर विजेत्यांचा सत्कार करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरिता रुपये १५.०० लाख इतका निधी आयुक्तालयास उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (वस्त्रोद्योग) यांनी संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>-**

राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत हातमाग कापड प्रचार प्रसिध्दी व वस्त्रोद्योग क्षेत्रातील कापड स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट डिझाइन करिता विणकर विजेत्यांचा सत्कार करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरिता “मागणी क्र व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघु उद्योग, (०३)(०७) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ च्या अंमलबजावणीच्या संबंधीचा प्रशासकीय खर्च, प्रसिध्दी, प्रकल्प व्यवस्थापन अभिकरण संबंधित खर्च व इतर खर्च (कार्यक्रम) (२८५१७४६३), ३३, अर्थसहाय्य” या लेखाशीर्षांतर्गत रु.१५,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा लक्ष फक्त) इतका निधी सन २०२५-२६ साठी मंजूर निधीतून आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वितरीत करुन खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून तसेच सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधी खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेमधील विविध तरतूदी व अटींचे पालन करण्याची तसेच, याबाबतची खर्चाची देयके तपासून निधी खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागामार्फत अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करून दिलेल्या निधी मर्यादेत प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

४. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास व शासनास सादर करावे.

५. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाने अनौ.सं.क्र.१५६/२०२६, दि.०९.०३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०३१६११३४०३३२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

KISHOR DAULAT PATIL

Digitally signed by KISHOR DAULAT PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=4BEC39283AF63752FC73A1FE212326AD4AF82CD1C1179BEB1C7CEAA687CEE32F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4ACEBAE058F9790422D1385B04BAA7B606C3951CA0FDE91204ACE3BB2EE4B2C5, cn=KISHOR DAULAT PATIL
Date: 2026.03.16 11:35:01 +05'30'

**( किशोर पाटील )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा व युवक कल्याण), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
५) मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
६) मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२) उपसचिव (रेशीम), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबड
१३) उपसचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१५) प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), मुंबई/नागपूर/छ.संभाजी नगर/सोलापूर
१६) निवड नस्ती (टेक्स-३).